# जिल्हादंडाधिकारी यांचे कार्यालय,जळगांव

आकाशवाणी केंद्राजवळ,जळगांव -४२५००१, तालुका जिल्हा-जळगांव

फोन नंबर ०२५७/२२२०१५२ Email Id- homebranchjalgaon@gmail.com फॅक्स नंबर-०२५७-२२२०५००

---

क्रमांक/दंडप्र/०१/कावि/ /२०१८ दिनांक - /०५/२०१८

प्रति,
उपविभागीय दंडाधिकारी (सर्व)

विषय:- उपविभागीय दंडाधिकारी यांचे आस्थापनेवरील पोलीस पाटील भरती बाबत

जळगांव जिल्हयांतील सर्व उपविभागीय दंडाधिकारी यांचे आस्थापनेवरील पोलीस पाटील रिक्त पदे एकूण २५४ भरणेबाबत जाहीरनामा आपल्या स्तरावरुन प्रसिध्द करण्यात आलेला आहे. पोलीस पाटील पदाबाबत ऑनलाईन अर्ज भरण्याची अंतिम तारीख ही दिनांक- १६/०५/२०१८ अशी देणेत आलेली आहे.

तथापी सुमारे ४८ गांवामध्ये पोलीस पाटील भरतीसाठी ऑनलॉईन अर्ज दिनांक- १६/०५/२०१८ पावेतो प्राप्त झालेले नाहीत. सदर गावातील पोलीस पाटील पदे रिक्त राहू नये, यासाठी सबंधित गावातून पोलीस पाटील पदासाठी अर्ज प्राप्त होणे अत्यावश्यक आहे.तरी सदरची पोलीस पाटील पदे रिक्त राहू नयेत यासाठी आपल्या आस्थापनेवरील पोलीस पाटील या पदांसाठी ऑनलाईन अर्ज भरण्याची अंतिम मुदत दिनांक- २५/०५/२०१८ व चलन भरण्याची अंतिम मुदत दिनांक- ३०/०५/२०१८ वाढवुन देणेत येत आहे.

तसेच या पदासाठीच्या लेखी परिक्षेची तारीख दिनांक- २७/०५/२०१८ अशी कळवण्यांत आली होती. तथापी सदर दिवशी होणारी लेखी परीक्षा पूढे ढकलण्यांत येत असुन परीक्षेची सुधारीत तारीख यथावकाश आपणांस कळवणेत येईल तरी आपण सबंधीत सर्वच गावांमध्ये तलाठी, मंडळ अधिकारी ,ग्रामपंचायत, तहसिलदार,गटविकास अधिकारी यांचे मार्फत मोठया प्रमाणात सदर पोलीस पाटील पदाच्या भरतीबाबत प्रसिध्दी दयावी व सदर पदांसाठी पुरेशे अर्ज प्राप्त होतील याची दक्षता घ्यावी.

तरी आपण सुधारीत जाहीरनामा प्रसिध्द करण्याची कार्यवाही तात्काळ करावी.व केलेल्या कार्यवाहीबाबत इकडील कार्यालयास अवगत करावे.

(किशोर राजे निंबाळकर)
जिल्हादंडाधिकारी जळगांव